म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ४८८

# डा

लेखक व प्रकाशक:

रामचंद्र वासुदेव दाते,
२८५ शनवार, पुणे.

मुद्रक

केशव रावजी गोंधळेकर,
०७ शनवार, पुणें.

२०

REFBK-0001815

किंमत दोन आणे.

रे. कार्या वाट



कापी २४८

शी धेनु वत्सा तशी आर्यमाता । तुम्ही लेंकरें
तां उगा धांव घेतां । करा मातृसेवा करा सार्थ
नातें । म्हणी राष्ट्रकार्था त्यजा मत्सरातें ॥ ६ ॥
पहा आर्यभू आजला दैन्यवाणी । नये धावुनी
एकही पुत्र कोणी । धरा लाजलज्जा जगीं अब्रु
जाते । म्हणी राष्ट्रकार्या त्यजा मत्सरातें ॥ ७ ॥
जनीं बोलती आर्य कां वांझ झाली । असे हीन
दुबळे कसे पुत्र व्याली ॥ असा काळिमा लागतां
झोंप येते । म्हणी राष्ट्रकार्यां त्यजा मत्सराते ॥८॥
असे देश माझा असे माय माझी । तिच्या उद्धरा-
तेंचि वाहीन ओझीं ॥ करा आजपासोनि ह्या
निश्चयातें । म्हणी राष्ट्रकार्यां त्यजा मत्सरातें ॥९॥

REFBK-0001815
REFBK-0001815

२८९५

श्री ग्रंथ संग्रहालय
कार्यानं. ५५५

येथून गेल्या फौजा दौडत। रट्टे लगवित रिपुच्या
पाठिंत। अटकेसन्निध सिंधू गांठित
शिंग फुंकावें। पेशवे नांव गर्जावें ॥ ४ ॥

पेशवाइच्या धनदौलतिला। पुणें शहर हें राजधानिला
बहू आवडलें शूर बाजिला
जन्मा यावें। म्हणवून पुणेकर घ्यावें ॥ ५ ॥

नशिब शिकंदर होते बाजी। नमवित दाढी येती
काजी। विनवी मोंगल करूनी हां जी
दिल्लिला यावें। खंडणी घेउनी जावें ॥ ६ ॥

भाउ चिमाजीआप्पा शूर। शौर्यसिंधुला आला पूर
रणदेवीचा एकचि सूर
उदया यावें। पेशवे नांव राखावें ॥ ७ ॥

आले उदया गायकवाड। शिंदे इमानी होळकर
जोड। बाजि धनी हा पुरवी कोड
शौर्य दावावें। उन्नतीशिखर गांठावें ॥ ८ ॥

ग्रंथालय
दा. क्र. १८७५
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

राजकारणी माधवराव । सागरवृत्ति, न लागे ठाव
पेशवाइचा उलटा डाव
दान पडावें । लवकरी आयु संपावें ॥ १४ ॥

तो नारायण बालपेशवा । आनंदीच्या नयनिं खुपावा
राजतृष्णेला बळी पडावा
पाप घडावें । बोलले राज्य सोडावें ॥१५॥

सवाइमाधव बालपेशवे । पुनरपि पहिले दिन गांठावे
परि बाजींचे भेदक कावे
साह्यक व्हावे । बोलले राज्य सोडावें ॥ १६ ॥

संशयरूपी राहू केतू । नाना विषयीं ये मनिं किंतू
डाव जिंकितो बाजी स्वार्थू
कां न निंदावें । हे फितूर घरचे व्हावे ॥ १७ ॥

फडणिस नाना जरि मुत्सद्दी । पेशवाइची सरतां सद्दी
दुष्ट बाजिची नाशक बुद्धि
दैव उलटावें । हे फितूर घरचे व्हावे ॥१८॥

ग्रंथ संग्रहालय

सभोंवार जन परान्नपुष्ट । कमवाया किती पडले
कष्ट । चाकर बुडवे मालक नष्ट
विषयीं रंगावें । दिवटाचि म्हणवुनी ध्यावें ॥२४॥

थाट शाहिरी होनाजीचा । कुठे पवाडा प्रभाक-
राचा । तलाव कोठें काव्यौघाचा
पाट सोडावे । स्फूर्तिचें कलम राखावें ॥ २५ ॥

गतकाळाच्या इतिहासाची । शुक्रचांदणी जशी
नभाची । वीर शाहिरी थाप डफाची
सर्व आठवावें । मानसीं स्वस्थ बैसावें ॥ २६ ॥

कटाव गेले तसे पवाडे । काव्यौघाला बंद कवाडें
पढो पंचावन पहिले पाढे
तुम्ही घोकावे । बाजिचे बोल ऐकावे ॥ २७ ॥

मिय्या बोले दाढी हाले । राजा बोले दळही हाले
मालक तैसा चाकर चाले
अनुभवा यावें । पेशवे नांव आठवावें ॥ २८ ॥

वदति मोडकीं तीं कारंजीं । निर्घृण काळा अह्मां
न गांजी । गतशतकाची आठवण होई
हाय ! बोलावें । मानसीं स्वस्थ बैसावें ॥ ३४ ॥

कधिं अस्मानी कधीं गुलाबी । कधीं केशरी कधीं
कुसुंबी । वेलबुट्यांची खुबीच नामी
शालु नेसावे । भिंतिचे बोल ऐकावे ॥ ३५ ॥

विटाळ नव्हता अशुद्धतेचा । जैसा अनुभव
आदर्शाचा । तसाचि होता मान आमुचा
लेणें ल्यावें । वैभवें जनां दिपवावें ॥ ३६ ॥

जरिपटक्याचें निशाण भगवें । आम्हीं त्याचें मूळ
धरावें । वाऱ्या वरती फडकत रहावें
लयाला जावें । लागलें खालीं ठेवावें ॥ ३७ ॥

शूरविरांचीं गुप्त खलबतें । तिथेंच मंजुळ प्रेम
बोलतें । स्वराज्यस्फूर्ति बाळ खेळतें
गीत ऐकावें । तल्लीन मानसीं व्हावें ॥ ३८ ॥

गेलें वैभव आयु रंडकें । स्मशानांतलें फुटकें मडकें
परावलंबन फल हें सडकें
काय ! चाखावें । कर्तव्यकर्म आठवावें ॥ ४४ ॥

त्यांचि मरावें जन्मायाया । यावें जन्मा त्यांचि
मराया । जन्ममरण हा खेळ न वाया
बोल ऐकावे । मनिं सार यांतलें घ्यावें ॥ ४५ ॥

उदया याया रवि मावळतो । निसर्ग आपुलें तत्व
न चुकतो । चहूंकडे हा न्यायचि दिसतो
नच विसरावें । मागलें पुढें चालावें ॥ ४६ ॥

तूं मेलेला आजि दिसावा । उन्नति व्हाया तुला
विसावा । योग्य काळ ये उदयचि व्हावा
ध्येय जिंकावें । कारणें स्वस्थ बैसावें ॥ ४७ ॥

नांव मराठा गाजुनि गेलें । फिरे खराटा नांव
लोपलें । हाय करित हा वाडा बोले
उदया यावें । कारणें स्वस्थ बैसावें ॥ ४८ ॥

योग्य वेळीं) १९२० सालीं पाहिजे तेंच. (योग्य पुस्तक

# दादाभाई नवरोजी यांचें चरित्र.

लेखकः—प्रो. नारायण सिताराम फडके, एम. ए. पुणें
" अल्लाहो अकबर " " प्रेमप्रसाद " " कर्तव्य-जागृति " " संसारसार " या कादंबऱ्यांचें कर्ते.

( १ ) लो॰ टिळक—चरित्र सुबोध आणि मनोरंजक झालें आहे. लोकांनीं तें संग्रही ठेवावें.

( २ ) न. चिं. केळकर—हें चरित्र आपल्या कुशल लेखणीनें आपण हृदयंगम केलें आहे.

( ३ ) कृ. प्र. खाडिलकर—भाषा सरळ व चटकदार, असून विषयांची मांडणी उठावदार

( ४ ) शि. म. परांजपे—कृति उत्तम साधली आहे. विवेचन मुद्देसूद व परिणामकारक.

( ५ ) अ. ब. कोल्हटकर—राजकारणाचा अभ्यास करणारास या पुस्तकाचा फार उपयोग होईल.

( ६ ) बॅ. जयकर—या पुस्तकावरून स्वराज्यवादाच्या इतिहासाची चांगली कल्पना येईल.

पुस्तकें मिळण्याचा पत्ता—रामचंद्र वासुदेव दाते,
सेक्रेटरी 'यशवंत ग्रंथप्रसारक मंडळी'
घ. नं. ५८५ शनवार, पुणें.